

# सरकारी कुंडीत उगवलेला निवडुंग!
# साहित्य अकादमीचा अनागोंदी कारभार

*२३ जानेवारी १९८४*

महाराष्ट्रात मराठी साहित्य संमेलन, मुंबई महानगर साहित्य संमेलन यांच्या अध्यक्ष पदावरून वाद निर्माण होऊन त्या निमित्ताने साहित्य संस्थांतील लाथाळ्या आणि मूठभर शिरजोरांचा लहरी कारभार चव्हाट्यावर आला आहे. राजधानीतील साहित्य अकादमी ही संस्थाही याबाबत मागे नाही. दिल्लीची मातीच अशी आहे की, तेथे काहीही पेरले; तरी त्यातून राजकारण उगवतेच. अकादमी त्याला अपवाद नाही.

तीस वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या संस्थेमुळे देशातील बावीस भाषांतील वाङ्मयाचे मळे बहरतील, परस्पर देवाण-घेवाण, अनुवाद यांमुळे वेगवेगळ्या भाषांतील साहित्य प्रवाह सर्वांना ठाऊक होतील, लेखकांना प्रोत्साहन मिळेल, प्रतिभेचे झरे अखंड वाहात राहतील अशी अपेक्षा होती; परंतु अनेक भाषांच्या साहित्याचा प्रचंड वटवृक्ष बनण्याऐवजी साहित्य अकादमी म्हणजे सरकारी कुंडीतील केवळ एक निवडुंग बनले आहे! राज्यसभेत २७ जून ७७ रोजी अकादमीबाबत चर्चा करताना प्रसिद्ध लेखक व इंदिरा काँग्रेसचे खासदार श्रीकांत शर्मा म्हणाले होते की, "सर्व अकादम्यांत 'मृत अकादमी' आहे ती साहित्य अकादमी."

## टीकेचे मोहोळ

बक्षिसे देताना होणारी वशिलेबाजी, वाङ्मय कोशासारखे पांढरे हत्ती बनलेले प्रकल्प, पुस्तकांच्या विक्रीबाबतची अनास्था, अनुवादाचा निकृष्ट दर्जा आणि काही मंडळींची मिरासदारी यांमुळे साहित्य अकादमीचा कारभार खिळखिळा झालेला आहे. अलीकडेच अकादमीतील काही प्रकरणांवरून वादळ उठले असून अकादमीचे सचिव श्री. रघुनाथ शंभुराव केळकर यांच्यावर टीकेचा भडिमार होत आहे.

आतापर्यंत सचिवपदाला घट्ट चिकटून बसलेले केळकर यांना नोकरीत दोनदा मुदतवाढ मिळाली व आता तर अकादमीचे सल्लागार म्हणून त्यांची नियुक्ती झाली

आहे. सल्लागार असे पद अस्तित्वात नाही, म्हणून अकादमीच्या खितपत पडलेल्या रामायण प्रकल्पात त्यांची वर्णी लागणार आहे. आता रामायण व केळकर यांचा तसा काही संबंध नसला; तरी कोठल्या ना कोठल्या प्रकारे आपली खुर्ची टिकावी, म्हणून केळकर यांनी ही हनुमान उडी मारली, हे मात्र खरे. नोकरीत मुदतवाढ देऊ नये, नवी पदे निर्माण करू नयेत, असा पंतप्रधानांचा आदेश असूनही तो येथे जुमानला गेलेला दिसत नाही.

हे केळकर महाराष्ट्रीय असले, तरी त्यांचे सर्व वास्तव्य उत्तरेतच झाले आहे. हिंदी व मराठीतील कृष्णकाव्याचा तुलनात्मक अभ्यास हा त्यांचा प्रबंध. एकूण बावीस पुस्तके लिहिल्याचा त्यांचा दावा आहे. आपल्या सहा कादंबऱ्या व कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत, असे केळकरांनी माझ्याशी बोलताना सांगितले. परंतु केळकर हे काही अत्यंत नावाजलेले कर्तबगार लेखक नव्हेत.

## मुदतवाढीचा किस्सा

सहायक सचिव म्हणून एप्रिल १९५९ रोजी ते अकादमीत रुजू झाले. त्यांची ३ सप्टेंबर ७५ ला सचिवपदी नेमणूक झाली. या नेमणुकीचाही किस्सा रंजक आहे. सचिवपदाच्या अर्जांची छाननी त्यांनीच करून निवड समितीकडे पाठविली. त्यांत त्यांचा स्वत:चाही अर्ज होता. ते ३१ ऑगस्ट ८१ ला सेवानिवृत्त व्हायचे होते. परंतु त्यांना जवळजवळ एक वर्ष आधीच नोकरीत दोन वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णय झाला.

२७ सप्टेंबर ८० रोजीच ठरले की, ऑगस्ट ८१ नंतर आणखी दोन वर्षे ते याच पदावर राहतील. त्यानंतर त्यांची मुदत ऑगस्ट ८३ मध्ये संपणार होती. दरम्यान फेब्रुवारी ८३ मध्ये शिक्षण मंत्रालयाकडून 'कोणालाही नोकरीत मुदतवाढ देऊ नये' असे आदेशही आले. तेव्हा नवीन सचिवाचा शोध घेण्यासाठी जाहिरात देणे इत्यादी प्रक्रिया लौकर सुरू व्हायला हवी होती. परंतु प्रत्यक्षात जून ८३ पर्यंत जाहिरातच देण्यात आली नाही. उमेदवारांच्या मुलाखती झाल्या ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात, पण एकही लायक उमेदवार सापडला नाही. तेव्हा पुन्हा जाहिरात देण्यात आली. दरम्यान केळकरांना सहा महिने आणखी मुदतवाढ देण्यात आली.

## परदेशवारीचा हव्यास

गेल्या ४-५ जानेवारी ८४ ला सचिवपदासाठी पुन्हा मुलाखती घेण्यात आल्या. अकादमीचे उपसचिव विष्णू खरे हेही एक उमेदवार होते. परंतु त्यांची निवड झाली नाही. हैद्राबाद येथे दक्षिण भारत हिंदी प्रचार समितीत प्राध्यापक म्हणून काम करणारे इंद्रनाथ चौधरी यांची निवड झाली. ते १ मार्च ८४ रोजी सूत्रे हाती घेतील. हे चौधरीही नावाजलेले ग्रंथकार नव्हेत. साहित्य अकादमीने गतवर्षीच प्रसिद्ध केलेल्या 'हूज हू' मध्ये त्यांचे नाव नाही. आता नवीन सचिवाची नेमणूक झाली, तेव्हा केळकरांना जावे

लागणार हे उघड होते. परंतु सध्या सचिवाला काही माहीत नाही, तेव्हा त्यांना सल्ला देण्यासाठी एक वर्ष केळकर यांनी आपली नियुक्ती करवून घेतली. अकादमीचे अध्यक्ष प्रा. व्ही. के गोकाक यांनी याबाबत आग्रह धरला व ही नियुक्ती झाली.

परदेशी वाऱ्या करायला मिळाव्यात म्हणून अकादमीची मंडळी प्रयत्न करीत असतात. १ जानेवारी ८० रोजी केळकर यांनी अमेरिकेतील डॉ. टेपलित्झ यांना लिहिलेल्या पत्रात, तुमच्या देशात माझ्यासाठी एखादी कामगिरी अथवा व्याख्यान दौरा आयोजित करावा, अशी विनंती केली होती. तर उपसचिव खरे हे अशी विदेशी आमंत्रणे मिळवण्यात कुशल आहेत, असे म्हटले जाते. समकालीन भारतीय साहित्यिक या नात्याने खरे यांनी परदेश प्रवास केला. सबंध देशात त्यांच्याखेरीज दुसरा कोणी जणू लेखकच नाही! प. जर्मनीत गतवर्षी श्रीकांत वर्मा, निर्मल वर्मा व वात्सायन जायचे होते; पण ऐनवेळी खरे पोचले. अकादमीत केळकरांचा एक गट व खरेंचा गट अशी सुदोपसुंदी चालू असून.त्यामुळे आम्हांला तर अगदी उबग आला आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया एका जाणकाराने व्यक्त केली.

## पारितोषिकांचा गोंधळ

अकादमीने गेल्या तीस वर्षांत विविध भाषांतील पुस्तकांना सुमारे साडेतीनशे पारितोषिके दिली. अनेकदा काही साहित्यिकांना आपल्याला पारितोषिक मिळणार हे ठाऊकच असते. पंजाबी भाषेतील लेखकांना सहा सहा महिने आधी याची कल्पना असते, असे ज्ञानपीठ विजेत्या श्रीमती अमृता प्रीतम यांनी म्हटले आहे. एकदा तर पंजाबी भाषेतील दहा पारितोषिकांपैकी सात पारितोषिके ही पंजाबीसाठी असलेल्या सल्लागार मंडळाच्या सदस्यांनीच पटकावली, असे साहित्य अकादमी, संगीत नाटक अकादमी व ललित कला अकादमी यांच्या कामकाजाची १९७२ मध्ये पाहणी करून खोसला समितीने दिलेल्या अहवालातच नमूद केले आहे.

मध्यंतरी एका वाङ्मयचौर्य केलेल्या पुस्तकालाच अकादमीत पुरस्कार मिळाला होता! नंतर तो मागे घेतला गेला. अलीकडेच एका डोगरी लेखकाने आपल्या भाषेत यापेक्षा चांगली पुस्तके आहेत, असे सांगून पारितोषिक नाकारले होते. हिंदीतील प्रसिद्ध कवी सर्वेश्वर दयाल सक्सेना हयात असताना त्यांच्या पुस्तकाची उपेक्षा अकादमीने केली व आता सक्सेनांच्या मृत्यूनंतर यंदा त्यांना पुरस्कार दिला आहे.

## गलथानपणा

पारितोषिकांमागे लेखक धावत सुटतात, हे उबग आणणारे आहे. 'रोख रक्कम देण्याऐवजी वर्षभर रेल्वेचा पास द्यावा, म्हणजे लेखकाला देश पाहता येईल.' अशी सूचना एका लेखकाने खोसला समितीला केली होती; तर पारितोषिके गुणवत्तेनुसार दिली जात नाहीत, बरेचसे कॅनव्हासिंग केले जाते, असे मत दुसऱ्याने व्यक्त केले होते. परीक्षक मंडळाची नावे गुप्त ठेवायला हवीत. परंतु ती हितसंबंधितांना बरोबर माहिती

असतात, असे आढळून आले आहे.

पुस्तक प्रकाशनांच्या बाबतीतही अकादमीत गलथानपणा आहे. १९७१ साली ८,९३,६७५ पुस्तकांपैकी ३,३९,६७९ गुदामात पडून होती. या पडून राहिलेल्या पुस्तकांचे मूल्य २५ लाख रुपये होते. अकादमीच्या १९८२-८३ च्या वार्षिक अहवालानुसार प्रकाशनावर सुमारे १५ लाख रुपये खर्च झाले व विक्रीतून उत्पन्न झाले अवघे पावणेसहा लाख रुपये. सध्याही लाखो रुपयांची पुस्तके गुदामात पडून आहेत. एका स्टेनोचीच विक्री व्यवस्थापक म्हणून बढती केली. त्यांना विक्रीचे तंत्र, वितरण ठाऊक नाही. ७८ ते ८१ काळात अकादमीने एकूण ३०३ पुस्तके प्रसिद्ध केली. त्यांपैकी ६६ मूळ व २१७ अनुवादित होती. गेल्या २३ वर्षांत झालेल्या १,०८७ पुस्तकांपैकी मूळ कलाकृती २१७ व बाकी सारे अनुवाद. इंग्रजी भाषेत ३९ व अन्य सर्व भाषांत मिळून २९ मूळ कलाकृती अकादमीने प्रकाशित केल्या, अशी माहिती शिक्षण राज्यमंत्री श्रीमती शीला कौल यांनी राज्यसभेत २६ मार्च ८२ ला दिली. तेव्हा भारतीय भाषांतील साहित्याला उत्तेजन देण्यासाठी ही अकादमी आहे की इंग्रजीतील पुस्तकांना, असा रास्त सवाल खासदार अजितकुमार शर्मांनी विचारला होता.

अकादमीमार्फत प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या अनुवादित पुस्तकांच्या अनुवादाचा दर्जा अगदी निकृष्ट असतो, असे खोसला कमिटीनेही म्हटले होते. इब्सेनच्या नाटकाचा ज्यांनी अनुवाद केला; त्यामुळे प्रत्येक पानावर पुन्हा इब्सेनला मरण आले अशी, टीका एका जाणकाराने केली आहे.

## विश्वकोशाचे काम

भारतीय साहित्याचा विश्वकोश हा तीन खंडांत प्रसिद्ध करण्याची महत्त्वाकांक्षी योजना अकादमीने आठ-नऊ वर्षांपूर्वी आखली. ७८ साली हा प्रकल्प पुरा व्हायचा होता; पण आता ८४ साल उजाडले, तरी पहिला खंडही तयार नाही. या प्रकल्पावर आतापर्यंत १० लाख रुपये खर्च पडले आहेत. विश्वकोशाचे मुख्य संपादक डॉ. सीमांशू .. काम सोडून निघून गेले आहेत. विश्वकोशासाठी विविध भाषांतील तज्ज्ञांनी पाठवलेली काही माहिती गहाळ झाल्याचेही सांगितले जाते. मराठीतील माहितीची फाईल हरवली आहे, असे अकादमीतीलच एका अधिकाऱ्याने मला सांगितले. अमरेश दत्ता हे नवे संपादक म्हणून रुजू व्हायचे असून त्यांना वर्षाकाठी पन्नास हजार रुपये मानधन दिले जाणार आहे!

अकादमी १९५४ साली स्थापन झाली. भाभा समितीने अकादमीबद्दल एक अहवाल १९६४ साली दिला होता. नंतर १९७२ साली खोसला समितीने अहवाल दिला. पण त्यांच्या शिफारशी सरकारच्या दप्तरात धूळ खात पडल्या आहेत. अकादमी स्वायत्त असली; तरी सरकारचे साठ लाख रुपये अनुदान मिळत असल्याने बऱ्याच बाबतीत सरकारचे अप्रत्यक्ष नियंत्रण राहते.

अकादमीत मूलगामी फेरबदल करायला हवेत. तेथील वातावरण बदलायला हवे.

तरच काही तरी भरीव कामगिरी अकादमी करू शकेल. त्यासाठी सर्व भाषांतील लेखकांनीच मोहीम होती घ्यायला हवी.

□

**– अशोक जैन**

**('राजधानीतून ... २' या पुस्तकातून)**